# मेट्रो ३ चा विस्तार नेव्ही नगरपर्यंत

**मुंबई** : कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो ३ या संपूर्ण भुयारी मेट्रो मार्गाचा विस्तार दक्षिणेकडील नेव्ही नगरपर्यंत करण्यासाठी मुंबई मेट्रो रेल कोर्पोरेशन लिमिटेडने (एमएमआरसीएलने ) सल्लागार नियुक्तीसाठी निविदा मागवली आहे. या नव्या विस्तारामुळे मुंबईच्या दक्षिणेकडील शेवटचे टोक जोडले जाणार असून, वाहतूक कोंडी सुटण्यास मदत होणार आहे.

एमएमआरसीएलने जाहीर केलेल्या निविदेनुसार, मुंबई मेट्रो लाइन ३ च्या दक्षिणेकडील विस्तारासाठी म्हणजेच कफ परेड ते नेव्ही नगर या २.५ किमी. विभागाचा तपशीलवार प्रकल्प अहवाल, पर्यावरण प्रभाव मूल्यांकन आणि सामाजिक प्रभाव मूल्यांकन अहवाल तयार करण्यात येणार आहे. हा अहवाल तयार करण्यासाठी सल्लागार



निवडण्यासाठी संस्थांकडून प्रतिसाद मागवला आहे. १ सप्टेंबरपर्यंत सल्लागार संस्थांनी प्रतिसाद द्यावा, असे आवाहन एमएमआरसीएलने केले आहे.

मेट्रो ३ चे काम २०२४ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित असून त्यानंतर या मार्गीच्या आराखडा अहवाल, आर्थिक सहाय्य याबाबींबाबत पक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे. प्रकल्पासाठी २ हजार ५०० कोटी प्रकल्प खर्च अपेक्षित आहे. सध्या मेट्रो ३ प्रकल्पाची लांबी ३३ ५ किमी असून, या विस्तारानंतर ३५.५ किमी. लांबी होणार आहे.

मेट्रो ३ च्या चाचणीसाठी प्रोटोटाइप पद्धतीचे ४ डबे मंगळवारीच मुंबईत दाखल झाले असून, चाचणी करण्यासाठी एमएमआरसीएलने लगबग सुरू केली आहे. एमएमआरडीएनेही विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नरिमन पॉइंट ते नेव्ही नगरपर्यंत सागरी सेतू उभारण्यासाठी निविदा मागवल्या आहेत. या प्रस्तावित्त पायाभूत प्रकल्पांमुळे रस्त्यावरील वाहतूक कोंडी कमी होणार आहे.